RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक ६८(२)] गुरुवार, मे ३०, २०१९/ज्येष्ठ ९, शके १९४१ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १६०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

पहिला मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० मे २०१९

**अधिसूचना**

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६.**

क्रमांक जमीन-२०१७/प्र.क्र.२६९/ज-१.—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ महा. ४१) च्या कलम ३२८, च्या पोट-कलम (१) व पोट-कलम (२) च्या खंड (चार), (दहा), (चौदा) व (त्रेसष्ठ) अन्वये महाराष्ट्र शासनास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व याबाबत त्यास समर्थ असणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ यामध्ये सुधारणा करण्यासाठी जे नियम करण्याचे योजिले आहे. त्या नियमांचा पुढील मसुदा उक्त संहितेच्या कलम ३२९, पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, त्याद्वारे बाधा पोहोचण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहेत आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त मसुदा महाराष्ट्र शासन दिनांक ३० जून २०१९ रोजी किंवा त्यानंतर विचारात घेतला जाईल :—

२. शासनाचे अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी), महसूल व वन विभाग, पहिला मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांचेकडे वरील दिनांकापूर्वी उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून येणाऱ्या/प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचना शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

**नियमांचा मसुदा**

१. या नियमांना, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) (सुधारणा) नियम, २०१९ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ च्या नियम ३१ च्या खालील स्पष्टीकरण ऐवजी नंतर पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात येत आहे :—

“**स्पष्टीकरण**.— या नियमांच्या प्रयोजनार्थ अनर्जित रक्कम म्हणजे—

(*i*) प्रत्यक्ष विक्रीद्वारे मिळालेली रक्कम आणि त्यातून खालील रक्कम वजा जाता शिल्लक राहिलेली रक्कम,–

(*ii*) (*a*) संबंधित शासकीय जमीन प्रदानासमयी शासनास अदा केलेली कब्जेहक्काची रक्कम, किंवा

(*b*) अशा विक्री पूर्वी सदर जमीन खरेदी केली असेल तर अशा खरेदीची रक्कम,

(*c*) अधिक अशा जमिनीमध्ये सुधारणा करण्याकरिता तसेच जमिनीचा धारणाधिकार वृद्धींगत करण्याकरिता किंवा वापरातील बदलासाठी शासनास अदा केलेली रक्कम यांचा समावेश राहील.”

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रमेश चव्हाण,**
शासनाचे उप सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 30th May 2019.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA LAND REVENUE CODE,1966.

No. Jamin-2017/C.R.269/J-1.— The following draft of rules further to amend the Maharashtra Land Revenue (Disposal of Government Lands) Rules, 1971, which the Government of Maharashtra, proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (*1*) and clauses (*x*) and (*lxiii)* of sub-section (*2*) of section 328 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah . XLI of 1966) and all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub-section (*1*) of section 329 of the said Code, for the infomation of all persons likely to be affected thereby ; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after 30th June 2019.

2. Any objection or suggestion, which may be received by the Additional Chief Secretary to Government of Maharashtra, Revenue and Forests Department, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya, Mumbai 400 032, from any person with respect to the said draft on or before the aforsaid date, will be considered by the Government.

*DRAFT RULES*

1. These rules may be called the Maharashtra Land Revenue (Disposal of Government Lands) (Amendment) Rules, 2019.

2. The rule *31* of the Maharashtra Land Revenue (Disposal of Government Lands) Rules, 1971, for Explanation the following shall be substituted, namely: –

"*Explanation.*—For the purposes of this rule unearned income means an amount equal to the difference between

(*i*) the price realized by way of sale, and,---

(*ii*) (*a*) the accupancy price paid to Government at the time of the grant, or

(*b*) the price at which the land was purchased immediately before such sale,

(*c*) plus the value of improvement made in the land, including the amount paid to the Government for upgradation of tenure or change of user of land."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAMESH CHAVAN,

Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR DR. NAMDEO KONDAJI BHOSALE.